MHOS130001952026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२६**
संतोष साळुंके व इतर वि. कोणी नाही

**आदेश निशानी क्र.०१ खाली**
**(घोषीत दिनांक – ०४.०७.२०२६)**

अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदारांचे थोडक्यात कथन आहे की, अर्जदार यांची पत्नी व आई नामे अनिता संतोष साळुंके ह्या दिनांक २०.१०.२०२१ रोजी टाटा हॉस्पीटल मुंबई येथे दवाखान्यात मयत झालेल्या आहेत. मयत अनिता साळुंखे हिस अर्जदार क्र.१ हा पती, अर्जदार क्र.२ व ४ ह्या मुली व अर्जदार क्र.३ हा मुलगा असे वारस आहेत. यांच्याशिवाय मयत अनिता संतोष साळुंके यांना इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांना ते मयताचे कायदेशीर वारस म्हणून ओळखण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत प्रकरणी, दैनिक संघर्ष समाजवादाचा उस्मानाबाद या वर्तमानपत्रामध्ये दि.१९.०२.२०२६ रोजी अर्जदारांच्या मागणीसंबंधी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यांत आले. सदर वर्तमानपत्राचा अंक **निशानी ११** वर दाखल करण्यांत आला आहे.

**०४.** अर्जदारांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदारांनी अर्जदार क्र.१ संतोष

गोपिनाथ साळुंके यांचे **निशानी १२** प्रमाणे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदारांनी **निशानी ०४** वरील सोबतच्या यादीप्रमाणे मयत अनिता संतोष साळुंके यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी प्रत, अर्जदार क्र.१ संतोष गोपिनाथ साळुंके यांचे वारसाबाबतचे शपथपत्र व अर्जदारांची आधारकार्डची पडताळणी प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. अर्जदारांनी **निशानी १३** प्रमाणे पुरावा बंद केल्याची पुरसीस दाखल केली आहे.

**०५.** मी अर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री. आर. एस. मुंडे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच अभिलेखावरील दाखल असलेल्या कादगपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

**०६.** निशानी १२ वरील शपथपत्राआधारे दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, अर्जदाराने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती करुन अर्जाला पुष्टी देणारा पुरावा दिलेला आहे. तसेच, त्यांच्या पुराव्याचे व कागदोपत्री पुराव्यामध्ये निशानी ०४ वरील सोबतच्या यादीप्रमाणे मयत अनिता संतोष साळुंके यांच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, मयत अनिता संतोष साळुंके हे दिनांक २०.१०.२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. अर्जदारांच्या मागणीबाबत निशानी ११ प्रमाणे दैनिक संघर्ष समाजवादाचा, उस्मानाबाद या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यांत आले असुन, त्याद्वारे मयताला वर नमुद वारसांशिवाय इतर कोणी वारस असतील तर त्यांनी त्यांच्या हरकती कळविण्याबाबत जाहीर करण्यांत आले होते. परंतू, सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊनही अर्जदारांच्या मागणीबाबत मुदतीमध्ये कोणीही हरकत वा आक्षेप दाखल केलेला नाही. त्यामुळे, अर्जदारांचा पुरावा विना आव्हानित राहिला.

**०७.** सबब, अभिलेखावर उपलब्ध असलेली कागदपत्रे व पुरावा यांचा विचार करता असे दिसुन येते की, वर नमुद वारस हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. म्हणून

वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात देणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. संतोष गोपीनाथ साळुंके, नम्रता भ्र. सुरज पवार, रितेश संतोष साळुंके व सायली पि. संतोष साळुंके हे मयत **अनिता संतोष साळुंके** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात देण्यांत यावे.

३. अर्जदारांनी नियमाप्रमाणे आवश्यक न्यायालयीन शुल्क भरणा करावे.

MATE ASHLESHA SOUDAGAR
Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2026.07.04 16:06:38 +0530

दिनांक : ०४.०७.२०२६

(**श्रीमती अश्लेषा एस. मते**)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र /आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र /आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | श्री. एस.एस.हिंगमिरे, लघुलेखिका ग्रेड–३ |
| न्यायालयाचे नाव | : | २रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, भूम. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | : | ०४.०७.२०२६ |
| आदेशावर पिठासिन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेचा दिनांक | : | ०४.०७.२०२६ |
| आदेश अपलोड केलेचा दिनांक | : | ०४.०७.२०२६ |